**प्रेस नोट** **दि.१९/०४/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## कर्नाटक येथील दाखल मिसींग मधील मुलीस तीचे वडीलांचे ताब्यात दिले बाबत

दि. १८/०४/२०१९ रोजी इसम नामे अनिकेत सोनवणे रा.पुणे यांनी खडकी रेल्वे स्टेशन पुणे परिसरात एक मुलगी वय २१ रा. बेंगलोर, कर्नाटक ही संशयीतपणे फिरत असले बाबत खडकी पोलीस ठाणेस कळवीले. त्यावर खडकी पोलीस ठाणे कडील म.पो.शि. जरे व म.पो.शि. माने यांनी सदर मुलीस ताब्यात घेतले. सदर मुलीकडे म. पोलीस उप निरीक्षक आजगेकर व स.पो.नि. देवकर खडकी पो. स्टे. पुणे यांनी सखोल चौकशी केली असता तीचे राहते घर सोडुन पळुन आल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाल्याने सदर मुलीकडुन तीचे वडील नामे श्रीधरलाल वय ४४ वर्षे रा. सदर यांचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्यांचेशी संपर्क साधुन त्याबाबत त्यांना कल्पना दिली. त्यानुसार सदर मुलीचे वडील आज दि. १९/०४/२०१९ रोजी सदर मुलीस ताब्यात घेणेकामी खडकी पोलीस ठाणेस समक्ष आले असता त्याबाबत आम्ही त्यांचेकडे खात्री करुन सदर मुलीस त्यांचे ताब्यात सुखरुप दिले आहे. श्रीधरलाल यांनी सदर मुलगी मिसींग बाबत कोतनुर पोलीस स्टेशन, नॉर्थ बँगलोर सिटी येथे दि. १८/०४/२०१९ रोजी तक्रार नोंदवीली होती.

सदर उत्तम कामगीरी म. पोलीस उप निरीक्षक आजगेकर, स.पो.नि. देवकर तसेच म. पोलीस शिपाई जरे व म. पो. शि. माने खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी केली आहे.

( भागवत मिसाळ )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.